साप्ताहिक
चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष


# चपराक

• वर्ष : १८
• अंक : ९
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

■ सोमवार, दि. १३ ते १९ एप्रिल २०२६
संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले
RNI No. MAHMAR/2011/35979

'Industrial Efficiency Award' Winner
■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants
For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.

Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

# कस्टोडियल डेथ : न्याय, व्यवस्था आणि जबाबदारीची कसोटी

**भारतासारख्या लोकशाही देशात 'कायद्याचे राज्य' ही केवळ एक संकल्पना नसून लोकांच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित असलेली मूलभूत गरज आहे. या कायद्याच्या राज्याचे रक्षण करण्याची सर्वात मोठी जबाबदारी पोलीस यंत्रणेवर असते परंतु गेल्या काही वर्षांत पोलिसांच्या ताब्यातील होणाऱ्या मृत्युंच्या म्हणजेच 'कस्टोडियल डेथ' घटनांनी समाजाला गंभीर आणि अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांसमोर उभे केले आहे. विशेषतः तमिळनाडूमधील साथानकुलम प्रकरणात ९ पोलिसांना सुनावण्यात आलेला मृत्युदंड हा या विषयाला नवे वळण देणारा ठरला आहे. हा निर्णय केवळ एका घटनेपुरता मर्यादित नसून, संपूर्ण पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धती, तिच्या मर्यादा आणि आवश्यक सुधारणा यावर प्रकाश टाकणारा आहे.**


ॲड. स्वप्निल श्रोत्री
पुणे
भ्रमणध्वनी : ८९५६८०१२४०

**घटनेची पार्श्वभूमी : एका किरकोळ कारणापासून सुरू झालेली शोकांतिका**

जून २०२० मध्ये, कोविड-१९ लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर तमिळनाडूतील थुथुकुडी जिल्ह्यातील साथानकुलम येथे पी. जयराज आणि त्यांचा मुलगा जे. बेनिक्स यांना दुकान ठरावीक वेळेपेक्षा जास्त वेळ उघडे ठेवल्याच्या कारणावरून पोलिसांनी अटक केली. ही अटक सुरुवातीला एक सामान्य कायदेशीर प्रक्रिया वाटत होती परंतु पुढे जे घडले त्याने संपूर्ण देशाला हादरवून सोडले. दोघांना साथानकुलम पोलीस ठाण्यात नेण्यात आले, जिथे त्यांच्यावर रात्रभर अमानुष अत्याचार करण्यात आले. साक्षीदारांच्या म्हणण्यानुसार आणि तपासातून समोर आलेल्या माहितीप्रमाणे, त्यांना निर्दयपणे मारहाण करण्यात आली, त्यांच्या शरीरावर गंभीर जखमा झाल्या आणि त्यांच्या मानवी सन्मानाची पायमल्ली करण्यात आली. इतकेच नव्हे तर गंभीर जखमी अवस्थेत असूनही त्यांना तात्काळ वैद्यकीय मदत देण्यात आली नाही. यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले मात्र त्यांची प्रकृती झपाट्याने खालावत गेली. २२ जून २०२० रोजी बेनिक्स यांचा आणि २३ जून २०२० रोजी जयराज यांचा मृत्यू झाला. ही घटना उघडकीस येताच देशभर संतापाची लाट उसळली. सोशल मीडियावर, माध्यमांमध्ये आणि सार्वजनिक चर्चेत पोलीस अत्याचारांचा मुद्दा केंद्रस्थानी आला.

तपास, न्यायालयीन प्रक्रिया आणि ऐतिहासिक निकाल या घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारवर आणि पोलीस यंत्रणेवर मोठा दबाव निर्माण झाला. अखेर या प्रकरणाची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आली. तपासादरम्यान संबंधित पोलिसांनी सत्तेचा गैरवापर करून अमानुष अत्याचार केल्याचे स्पष्ट झाले.'या प्रकरणात एकूण १० पोलिसांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला तर उर्वरित ९ जणांवर खटला चालवण्यात आला. दीर्घकालीन न्यायप्रक्रियेनंतर २०२६ मध्ये मदुराई सत्र न्यायालयाने या सर्व ९ पोलिसांना दोषी ठरवले आणि या प्रकरणाला 'दुर्मीळातील दुर्मीळ घटना' मानत खूनाच्या आरोपाखाली मृत्युदंडाची शिक्षा सुनावली.

**न्यायालयाचा हा निर्णय अनेक कारणांनी ऐतिहासिक ठरतो :**

१. पोलीस अत्याचाराच्या प्रकरणात इतक्या मोठ्या प्रमाणावर मृत्युदंडाची शिक्षा अत्यंत दुर्मीळ आहे. २. यायालयाने स्पष्ट केले की कायद्याचे रक्षकही कायद्यापेक्षा वर नाहीत. ३. सत्तेचा गैरवापर केल्यास कठोर शिक्षा होणार, हा संदेश देण्यात आला. तथापि, या निर्णयाने एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. केवळ शिक्षा देऊन ही समस्या सुटणार आहे का?

**कस्टोडियल डेथ :** वाढती समस्या आणि चिंताजनक आकडेवारी

कस्टोडियल डेथ हा भारतात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला विषय आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी)च्या अहवालानुसार दरवर्षी अनेक आरोपी किंवा संशयित व्यक्ती पोलिसांच्या ताब्यात असताना मृत्युमुखी पडतात.

भारतातील कस्टोडियल डेथच्या संदर्भात नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो आणि इतर संबंधित संस्थांच्या अलीकडील आकडेवारीवर नजर टाकल्यास ही समस्या किती गंभीर स्वरूप धारण करत आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. पोलीस कोठडीतील मृत्यूंच्या आकडेवारीत काही काळ घट दिसून आली असली तरी नंतर पुन्हा वाढ होताना दिसते. उदाहरणार्थ, २०१७-१८ मध्ये सुमारे १४६ प्रकरणे नोंदवली गेली होती, जी २०१९-२० मध्ये ११२ पर्यंत खाली आली; मात्र २०२१-२२ मध्ये ती पुन्हा वाढून सुमारे १७५ वर पोहोचली. अलीकडील वर्षांतील ट्रेंड पाहिला असता, २०२३-२५ दरम्यान देशभरात दरवर्षी साधारण १०० ते ११० पोलीस कोठडीतील मृत्यू होत असल्याचे अंदाज व्यक्त केले जातात. ही संख्या वरकरणी कमी वाटत असली तरी प्रत्येक मृत्युमागे मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन दडलेले असते. याचबरोबर न्यायालयीन कोठडी किंवा कारागृहांमधील मृत्यूंची संख्या पोलीस कोठडीपेक्षा खूपच जास्त आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार २०२१-२२ मध्ये सुमारे २१५० हून अधिक मृत्यू कारागृहांमध्ये झाले तर २०२३ मध्येही ही संख्या १७०० पेक्षा जास्त राहिली. त्यामुळे एकूण कस्टोडियल डेथचे प्रमाण दरवर्षी २००० ते २५०० च्या दरम्यान असल्याचे चित्र दिसते. काही अहवालांनुसार भारतात दररोज सरासरी ५ ते ७ लोक कस्टडीत मृत्युमुखी पडतात, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. या आकडेवारीतील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे दोषसिद्धीचे अत्यल्प प्रमाण. अनेक वर्षांत शेकडो प्रकरणे नोंदवली गेली असली तरी त्यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. यामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो आणि अशा घटनांना आळा बसत नाही. राज्यनिहाय पाहता महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, तमिळनाडू यासारखी राज्ये सातत्याने या यादीत वर दिसतात, जे या समस्येचे व्यापक स्वरूप अधोरेखित करते. एकंदरीत नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की भारतातील कस्टोडियल डेथ ही केवळ अपवादात्मक घटना नसून ती एक प्रणालीगत समस्या बनली आहे. पोलीस कोठडीतील अत्याचार, वैद्यकीय सुविधांचा अभाव, कारागृहांतील गर्दी तसेच आधुनिक तपास तंत्रज्ञानाची कमतरता ही या समस्येची प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे केवळ कठोर शिक्षा देणे पुरेसे नाही तर व्यवस्थात्मक सुधारणा करणे अत्यावश्यक आहे.



**पोलीस यंत्रणेवरील ताण आणि मर्यादा :**

कस्टोडियल डेथसारख्या घटनांचा विचार करताना केवळ पोलिसांना दोष देणे हा एकांगी आणि अपूर्ण दृष्टिकोन ठरतो. वास्तव पाहिले तर भारतातील पोलीस यंत्रणा अनेक संरचनात्मक, प्रशासकीय आणि सामाजिक मर्यादांमध्ये काम करत आहे. या मर्यादांचा त्यांच्या कामाच्या पद्धतीवर आणि निर्णयक्षमतेवर थेट परिणाम होतो.

सर्वप्रथम अपुरे मनुष्यबळ ही सर्वात मोठी समस्या आहे. भारताची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत असताना त्या प्रमाणात पोलीस दलाची वाढ झालेली नाही. अनेक ठिकाणी एका पोलिसावर हजारो नागरिकांची जबाबदारी येते. परिणामी, प्रत्येक प्रकरणाकडे पुरेसा वेळ आणि लक्ष देणे शक्य होत नाही. यामुळे तपासाची गुणवत्ता कमी होते आणि पोलिसांवर अनावश्यक ताण निर्माण होतो.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे दीर्घ कामाचे तास. भारतातील अनेक पोलीस कर्मचारी १२ ते १६ तासांपर्यंत सलग काम करतात. त्यांना ठरावीक शिफ्ट सिस्टीम किंवा पुरेशी विश्रांती मिळत नाही. सण-उत्सव, निवडणुका, आंदोलन, व्हीआयपी ड्युटी अशा विविध कारणांमुळे त्यांचा कामाचा ताण अधिकच वाढतो. सततच्या या थकव्यामुळे त्यांच्या निर्णयक्षमतेवर परिणाम होतो आणि कधी कधी आक्रमक वर्तनाची शक्यता वाढते.

तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे मानसिक ताण आणि दबाव. पोलिसांना रोज गुन्हेगारी, हिंसा, अपघात, मृत्यू

पान ८ वर ▸▸